# University of Mumbai

पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष,
परीक्षा विभाग
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई - ४०० ०९८

क्र. परीक्षा / पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/ ९६८/२०१९

परिपत्रक :-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/प्रमुख विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण परिक्षेत्राचे समन्वयक/संचालक, आपणास कळविण्यात येते की, प्रथम सत्र २०१९ मध्ये विद्यापीठाने घेतलेल्या T.Y.B.Com (Sem-VI) (Choice Based) या परीक्षेचा निकाल दि. २५ मे, २०१९ रोजी जाहिर करण्यात आला; या परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी या अभ्यास कमाच्या प्रथम / द्वितीय वर्षासाठी 7 Grade Point System प्रमाणे प्रविष्ठ झालेले होते व तृतीय वर्षाला 10 Grade Point System प्रमाणे प्रविष्ठ झालेत अश्या विद्यार्थ्यांचे निकाल राखिव ठेवण्यात आले होते. या विद्यार्थ्यांचे राखिव असलेले निकाल दि. २६ जुलै, २०१९ रोजी जाहिर करण्यात आलेत. अश्या विद्यार्थ्यांचे या अभ्यासक्रमाच्या ज्या चार विषयांची परीक्षा विद्यापीठाने घेतलेली आहे या विषयांसाठीचे पुनर्मूल्यांकन व छायांकित प्रतीसाठीचे अर्ज व यासाठीचे विहित शुल्क **Online** पद्धतीने विद्यापीठाच्या **www.mu.ac. in** या अधिकृत संकेत स्थळावरून घेण्यात येणार आहेत.

**Path for online Application:-**
www.mu.ac.in ⟶ Exam & Results ⟶ Examination ⟶ Application for Revaluation / Photocopy
Read the instructions carefully and proceed for filling the form.

तसेच उर्वरीत ज्या दोन विषयांची परीक्षा विद्यापीठाच्यावतीने संबंधित महाविद्यालयांनी घेतलेली आहे या विषयांसाठी पुनर्मूल्यांकनासाठीचा अर्ज सॉफ्ट कॉपी (सी.डी.) व हार्ड कॉपी (पारंपारीक अर्ज) स्वरूपात परिपूर्णरित्या भरून संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सहीशिक्यानिशी विहित शुल्कासह परीक्षा विभागातील पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, रूम नं. ४७, दुसरा मजला येथे स. ११.०० ते दु. २.३० या वेळेत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती. तसेच या दोन विषयांच्या छायांकित प्रती महाविद्यालयाने आपल्या पातळीवर मागणीप्रमाणे पुरवाव्यात.

विद्यापीठाकडे पुनर्मुल्यांकनासाठीचे वरील प्रमाणे अर्ज पाठविताना अर्ज परिपुर्णरित्या व अचूक भरलेले आहे याची खात्री करून घ्यावी. अर्ज अपूर्ण भरलेला व अर्जात चुकीची माहिती असल्यास व यामूळे भविष्यात काही बाबी उद्भवल्यास त्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

उपरोक्त दोन्ही प्रकारचे अर्ज स्वीकारण्याचा कालावधी खालील प्रमाणे आहे:-

दि. ०७ ऑगस्ट २०१९ ते १३ ऑगस्ट, २०१९

अर्ज स्वीकारण्याची वरील मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

पुढे असे की या दोन्ही विषयांचे पुनर्मुल्यांकन महाविद्यालय स्तरावर करून पुनर्मुल्यांकनात प्राप्त गुणांची यादी सॉफ्ट कॉपी (सी.डी.) व हार्ड कॉपी स्वरूपात दि.२७ ऑगस्ट, २०१९ पर्यंत पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, रूम नं. ४७, दुसरा मजला येथे स. ११.०० ते दु. २.३० या वेळेत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.

उपरोक्त दोन्ही पद्घतीसाठीचा शुल्काचा तपशील:-

| | खुल्या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी | राखीव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी (Those who get concession in tution fees and other fees) |
|---|---|---|
| अर्ज शुल्क :- | रू. १०/- | रू. १०/- |
| पुनर्मुल्यांकन शुल्क :- | रू. २५०/- | रू. १२५/- |
| छायांकित प्रत शुल्क :- | रू. ५०/- | रू. २५/- |

तरी उपरोक्त बाबीची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

(डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०१९

अ. प्रत:-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/प्रमुख विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण परिक्षेत्राचे समन्वयक/संचालक